|| श्री गणेशाय नमः ||

# हरी ॐ धार्मिक पूजा विधी केंद्र

ज्योतिष आणि वास्तु सल्लागार

Astro • Puja • Vastu

## आरती श्रीविठ्ठलाची

युगे अठ्ठावीस विटेवरी उभा ।। वामांगीं रखुमाई दिसे दिव्य शोभा।। पुंडलिकाचे भेटी परब्रह्म आलें गा।।
चरणीं वाहे भीमा उद्धरी जगा ।।१।।

जय देव जय देव जय पांडुरंगा।। रखुमाईवल्लभा राईच्या वल्लभा पावें जिवलगा।। जय० ।। धृ० ।।

तुळसीमाळा गळां कर ठेवुनि कटी ।। कांसें पीतांबर कस्तुरी लल्लाटीं।। देव सुरवर नित्य येती भेटी ।।
गरुड हनुमंत पुढे उभे राहती।। जय० ।।२।।

धन्य वेणूनाद अनुक्षेत्रपाळा ।। सुवर्णाचीं कमळें वनमाळा गळां ।। राही रखुमाबाई राणीया सकळा ।।
ओंवाळीती राजा विठोबा सांवळा ।। जय० ।। ३।।

ओंवाळू आरत्या कुरवंड्या येती ।। चंद्रभागेमाजी सोडुनियां देती ।। दिंड्या पताका वैष्णव नाचती ।।
पंढरीचा महिमा वर्णावा किती ।। जय० ।।४।।

आषाढी कार्तिकी भक्तजन येती ।। चंद्रभागेमाजीं स्नानें जे करिती ।। दर्शन हेळामानें तयां होय मुक्ती।।
केशवासी नामदेव भावें ओंबाळिती ।। जय० ।।५।।

### आरती श्रीविठ्ठलाची

येई हो विठ्ठले माझे माउली ये ।। निढळावरी कर ठेवुनि वाट मी पाहें।। धृ०।।
आलिया गेलिया हातीं धाडीं निरोप ।। पंढरपुरीं आहे माझा मायबाप ।। येई०।।१।।
पिवळा पीतांबर कैसा गगनीं झळकला ।। गरुडावरी बैसूनि माझा कैवारी आला ।। येई०।।२।।
असो नसो भाव आम्हां तुझिया ठाया ।। कृपादृष्टी पाहे माझा पंढरीराया।। येई० ।।३।।
विठोबाचें राज्य आम्हां नित्य दिपवाळी।। विष्णुदास नांमा जीवें भावें ओवाळीं।। येई०।।४।।

### पांडुरंगाची कांकड आरती

उठा पांडुरंगा आतां, दर्शन द्या सकळां । झाला अरुणोदय, सरली निद्रेची वेळा ॥ ध्रु० ॥
संत साधू मुनी अवघे, झालेली गोळा सोडा शेजसुख आतां, पाहूं द्या मुखकमळा ॥ १ ॥
गमंडपीं महाद्वारीं, झालीसे दाटी । मन उतावेळ, रूप पहावया दष्टीं ॥ २ ॥
राई रखुमाबाई, तुम्हां येऊ द्या द्या । शेजे हालवुनी जागें करा देवराया ॥ ३ ॥
गरुड हनुमंत, उभे पाहती वाट । स्वर्गांचे सुरवर घेऊनि आले बोभाट ॥ ४ ॥
झाले मुक्तद्वार, लाभ झाला रोकडा । विष्णुदास नामा उभा घेऊनी कांकडा ॥ ५ ॥


HARI OM DHARMIK PUJA VIDHI KENDRA

योगेशशास्त्री ढवळे (गुरुजी) : 95944 28749 | निलेशशास्त्री ढवळे (गुरुजी) : 86524 02078

SANPADA OFFICE
Office No.8, 1st Flr, Shiva Triveni Galleria CHS.,
Plot No. 13, Sector 8, Sanpada, Navi Mumbai

GOVANDI OFFICE
Shri Swaybhu Hanuman Mandir, Deonar
Mahanagarpalika Vasahat, Govandi, Mumbai.

hariom astrologers | hariom astrologers | hariom_astrologers
hariomastrologers@gmail.com | www.hariomastrologers.com